# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक:26.04.2024** **वार:शुक्रवार**

---

1. लोकसभा निवडणूकीच्या दुसऱ्या टप्प्यात 13 राज्य आणि केंद्र शासित प्रदेशातील 88 मतदारसंघांमध्ये मतदानाला प्रारंभ
2. पाचव्या टप्प्याची अधिसूचना जारी; राज्यातल्या 13 मतदारसंघांमध्ये 20 मे रोजी होणार मतदान
3. शंभर टक्के व्हीव्हीपॅट पडताळणीबाबत सर्वोच्च न्यायालय आज निर्णय देणार आणि
4. देशाच्या पूर्व आणि दक्षिणेकडच्या राज्यात पुढचे चार दिवस उष्णतेच्या तीव्र लाटेचा हवामान विभागाचा इशारा

**<u>निवडणूक</u>**

लोकसभा निवडणूकीच्या दुसऱ्या टप्प्यात आज 13 राज्य आणि केंद्र शासित प्रदेशातील 88 मतदारसंघांमध्ये सकाळी 7 वाजता मतदानाला सुरुवात झाली. सर्व मतदान केंद्रांवर चोख सुरक्षा व्यवस्था तैनात असून आवश्यक सर्व सुविधा निवडणूक आयोगाकडून पुरवल्या जात आहेत. या टप्प्यात केरळच्या वीस, कर्नाटकच्या 14, राजस्थानच्या 13, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्राच्या प्रत्येकी आठ, मध्य प्रदेशच्या सहा, आसाम आणि बिहारमधील प्रत्येकी पाच, पश्चिम बंगाल आणि छत्तीसगडच्या प्रत्येकी तीन आणि मणिपूर, त्रिपुरा आणि जम्मू-काश्मीरच्या प्रत्येकी एका जागेसाठी लढत होत आहे. वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर बिहारमधील बांका, मधेपुरा, खगरीया, आणि मुंगेर मतदारसंघात मतदानाची वेळ संध्याकाळी 6 वाजेपर्यंत वाढवण्यात आली आहे. नक्षलप्रभावीत बांका लोकसभा क्षेत्रात कटोरीया आणि बेल्हार इथं तसंच मणिपूरमधील 8 जिल्ह्यातील 13 मतदारसंघांत संध्याकाळी 4 वाजेपर्यंत मतदानाची वेळ निश्चित करण्यात आली आहे.

16 लाखांहून अधिक मतदान अधिकारी, कर्मचारी 1 लाख 67 हजार मतदान केंद्रांवर तैनात आहेत. या टप्प्यात 34 लाख 8 हजार नवमतदारांसह 15 कोटी 88 लाख पात्र मतदार आहेत. मतदान सामग्री आणि सुरक्षा रक्षकांच्या वाहतुकीसाठी तीन हेलिकॉप्टर्स, चार विशेष रेल्वे गाड्या आणि सुमारे 80 हजार वाहनं तैनात करण्यात आली आहेत. 50 टक्क्यांहून अधिक मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग करण्यात येणार असून, सर्व मतदान केंद्रांवर निरिक्षक तैनात आहेत. मध्य प्रदेशमधील बेतूल संसदीय क्षेत्रातील उमेदवाराच्या निधनामुळे या भागातील मतदान प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली असून या भागात तिसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे. महाराष्ट्रातील 8 मतदारसंघात आज मतदान होत असून यामध्ये अमरावती, अकोला, वर्धा, यवतमाळ-वाशिम, नांदेड, परभणी, हिंगोली, आणि बुलडाणा, या मतदारसंघांचा समावेश आहे.

केरळमधील वायनाडमधून काँग्रेस नेते राहुल गांधी, तिरुअनंतपुरममधून केंद्रीय मंत्री राजीव चंद्रशेखर तसंच काँग्रेसचे शशी थरूर बेंगलूरू दक्षिणमधून भाजपाचे तेजस्वी सूर्या, मथुरामधून भाजपच्या हेमा मालिनी, मेरठमधून भाजपचे अरुण गोविल, मंड्यातून कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एचडी कुमारस्वामी आणि पूर्णियामधून पप्पू यादव या प्रमुख उमेदवारांचं राजकीय भवितव्य आज मतदान यंत्रात बंद होणार आहे. मतदान सुरु असलेल्या सर्व मतदार संघातल्या नागरिकांनी मोठ्या संख्येनं मतदान करावं असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरील संदेशात केलं आहे.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याची अधिसूचना आज जारी झाली. यात महाराष्ट्रातल्या 13 मतदारसंघांचा समावेश आहे. त्यात मुंबईतले सर्व 6 मतदारसंघ, ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे या लोकसभा मतदारसंघांमध्ये 20 मे रोजी मतदान होणार आहे. या सर्व ठिकाणी आजपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात होईल. उमेदवारांना 3 मेपर्यंत अर्ज दाखल करता येतील. 4 मे रोजी अर्जांची छाननी होईल, तर 6 मे ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची मुदत असेल.

**<u>आंध्रप्रदेश विधानसभा</u>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात आंध्र प्रदेशमधल्या विधानसभा निवडणुकीसाठीही 13 मे रोजी मतदान होणार आहे. काल उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी सर्व प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. राज्यात 175 विधानसभा मतदारसंघांसाठी 5729 उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. मुख्यमंत्री, वायएसआर काँग्रेसचे प्रमुख जगन मोहन रेड्डी पुलुवेंडीली आणि विरोधी पक्षनेते तेलगू देसम पक्षाचे प्रमुख एन. चंद्राबाबू नायडू कप्पम विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवत आहेत.

**<u>पंतप्रधान-सभा</u>**

पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी बिहारमधील अरेरीया आणि मुंगेर इथं आज प्रचारसभेला संबोधित करणार आहेत. पंतप्रधानांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर दोन्ही ठिकाणी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

**<u>शरद पवार जाहीरनामा</u>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा जाहीरनामा पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते काल प्रकाशित करण्यात आला. शपथनामा या नावानं प्रकाशित झालेल्या या जाहीरनाम्यात स्वयंपाकाच्या गॅसचा दर पाचशे रुपयांपर्यंत करणे, शेतकऱ्यासाठी कर्जमाफी, आयात निर्यात धोरण ठरविण्यासाठी आयोग स्थापन करणे, सत्तेत आल्यानंतर जातनिहाय जनगणना, महिला आरक्षण, कृषी उत्पादन आणि शैक्षणिक साधने यावर शून्य टक्के जी एस टी आदी गोष्टींचा समावेश आहे. एक देश एक निवडणूक या संकल्पनेला पक्षाचा विरोध असल्याचंही यात स्पष्ट केलं आहे. नागरिकत्व कायदा, राष्ट्रीय नागरिक नोंदणी, दहशतवादाविरोधातला युएपीए कायदा इत्यादी कायद्यांचा फेर आढावा घेऊन त्यात बदल करण्याचं आश्वासन पक्षानं जाहीरनाम्यातून दिलं आहे.

**<u>जाहीरनामा-मुंबई</u>**

लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा वचननामा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल मुंबईत जाहीर केला. किमान 5 जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवणार, शेतकऱ्यांना कर्जमुक्त करणार, पीकविम्याचे निकष बदलणार, तसंच 'विकेल ते पिकेल' या योजनेचं पुनरुज्जीवन करण्याचं आश्वासन यात देण्यात आलं आहे. जिल्हा रुग्णालयं अद्ययावत करणे, रोजगाराच्या संधी वाढवणे इत्यादी घोषणा या वचननाम्यात आहेत. देशाची आर्थिक राजधानी म्हणून मुंबईचं स्थान पुन्हा मिळवून देणार असल्याच सांगून पर्यावरणाला घातक प्रकल्पांना आपला विरोध कायम राहील, असं ठाकरे यांनी सांगितलं.

**<u>व्हीव्हीपॅट</u>**

व्हीव्हीपॅटच्या शंभर टक्के पडताळणीबाबतचा निर्णय सर्वोच्च न्यायालय आज देणार आहे. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स या संस्थेसह अन्य काही व्यक्ती आणि संस्थांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान केल्यानंतर

दिलेलं मत आणि त्याची कागदी पोचपावती यांची शंभर टक्के पडताळणी करावी अशी मागणी करणाऱ्या याचिका न्यायालयात दाखल केल्या आहेत. त्यावरील सुनावणी 18 एप्रिलला पूर्ण झाली. परवा 24 एप्रिलला न्यायालयाचा निर्णय अपेक्षित होता. मात्र निवडणूक आयोगाला काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर आणखी स्पष्टीकरण देण्यास सांगून न्यायालयानं निर्णय राखून ठेवला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या कामकाजाच्या यादीनुसार न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपांकर दत्ता या प्रकरणी स्वतंत्रपणे निर्णय देणं अपेक्षित आहे.

**<u>नेपाळ प्रदर्शन</u>**

नेपाळमधल्या गुंतवणूक परिषदेच्या पार्श्वभूमीवर तिथल्या स्वतंत्र उर्जा उत्पादक संघटनेनं काठमांडूत हिमालय जल प्रदर्शन आयोजित केलं होतं. समृद्धीसाठी हरित उर्जा ही या प्रदर्शनाची मध्यवर्ती संकल्पना आहे. या प्रदर्शनाचं उद्घाटन नेपाळचे राष्ट्राध्यक्ष रामचंद्र पौडेल यांच्या हस्ते झालं. सर्व देशी परदेशी गुंतवणूकदारांनी एकमेकांच्या साथीनं हरित उर्जा विकासासाठी काम करावं असं आवाहन पौडेल यांनी यावेळी केलं.

**<u>प्रत्यक्ष करमंडळ</u>**

केंद्रिय प्रत्यक्ष कर मंडळानं अर्थात सीबीडीटी नं विश्वस्त संस्था आणि वित्तीय संस्था यांना कर भरण्यासाठीचे 10 ए आणि 10 एबी अर्ज दाखल करण्याला येत्या 30 जूनपर्यंत मुदतवाढ दिली आहे. अशा एखाद्या संस्थेकडून 2022-23 या आर्थिक वर्षासाठी 10 ए अर्ज सादर करणं राहून गेलं असेल तर त्यांनाही 10 एसी अर्ज सादर करुन 2022-23 च्या नोंदणीसाठी अर्ज करता येईल. तसंच ज्या संस्थांचे पुनर्नोंदणीसाठीचे अर्ज मुदत संपल्यामुळे नाकारण्यात आले होते त्यांनाही 30 जूनपर्यंत नव्यानं अर्ज दाखल करता येतील असं सीबीडीटी नं स्पष्ट केलं आहे.

**<u>हवामान</u>**

पुढचे चार दिवस देशाच्या पूर्व आणि दक्षिणे कडच्या राज्यात उष्णतेची तीव्र ते अतीतीव्र लाट येऊ शकते असा इशारा हवामान विभागानं दिला आहे. कोकणासह बिहार, झारखंड, आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीचा भाग, तेलंगण, यानम, रायलसीमा आणि कर्नाटकच्या अंतर्गत भागात उष्णतेची लाट कायम राहील असं हवामान विभागानं म्हटलं आहे. दरम्यान, जम्मू काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड राज्यात काही ठिकाणी येत्या दोन दिवसात गारपीट किंवा जोरदार पाऊस होईल. देशाच्या वायव्य भागात विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. त्रिपुरा, केरळ, कर्नाटकची किनारपट्टी, तामिळनाडू, पुदुचेरी, कारिकल, आसाम, मेघालय, कोकण आणि गोव्यात हवामान उष्ण आणि दमट असेल. राजधानी दिल्लीत वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार